# महिला सक्षमीकरणातील पंचायत राजची भूमिका

**प्रा. एस.एस. निलंगेकर**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
जयक्रांती कला व वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालय, लातूर

आपल्या देशात फार पुर्वीपासूनच पुरूषप्रधान संस्कृती अस्तित्वात असलेली दिसून येते. चुल आणि मुल एवढ्यापुरतीच स्त्रीयांची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या सुरूवातीच्या कालखंडात देखील स्त्रीयांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व कौटुंबिक क्षेत्रातील स्थिती व दर्जा यात फारसा बदल झालेला दिसून येत नाही.

स्वातंत्र्यानंतर 20 जून 1958 रोजी राजस्थानमधील नागौर या जिल्ह्यात स्थानिक समस्या स्थानिक पातळीवर सोडविण्यासाठी पहिली त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आली. महाराष्ट्रात नाईक समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार पंचायत राज व्यवस्था निर्माण करण्यात आली.

तत्कालीन पंचायत राज व्यवस्थेमध्ये महिलांना पुरेसे प्रतिनिधीत्व प्राप्त झालेले नव्हते. तसेच घटनेत याची तरतूद नसल्यामुळे वेगवेगळ्या घटक राज्यात पंचायत व्यवस्था मोडकळीस येण्यास सूरूवात झाली. वीस-वीस वर्षे तेच-ते पदाधिकारी पदावर चिटकून बसलेले होते.

वरील परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी भारतीय राज्यघटनेत 73 वी व 74 वी घटनादुरूस्ती 1993 मध्ये करण्यात आली. ज्यामध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण, राज्य वित्त आयोगाची स्थापना, निवडणूक आयोगाद्वारे निवडणूका, जातनिहाय आरक्षण या तरतूदी करण्यात आल्या. ज्याची आजही प्रभावीपणे अंमलबजावणी होताना दिसून येते.

ख[]या अर्थाने 1993 मध्ये केल्या गेलेल्या 73 व्या व 74 व्या घटना दुरूस्तीने महिलांना स्था. स्व.संस्थामध्ये प्रतिनिधीत्व मिळाले. त्यानंतर मोठ्या संख्येने महिला स्थानिक निवडणुकीत सहभागी होऊन प्रतिनिधीत्व करताना दिसून आल्या. महिलांच्या तत्कालीन स्थितीबाबत राज्य महिला आयोगाने म्हटले होते की, महिलांसाठी काही करावे वाटत असेल तर इतकेच करा, उघडा तिचे डोळे पाहू द्या तिला जगाकडे आपल्या दृष्टीकोनातून,सोडा तिचे हात, दाखवू द्या तिला सामर्थ्य आपल्या कर्तत्वाचे, सोडा तिच्या पायातल्या श्रृंखला, कापू द्या तिला चराचर विश्व स्वपदने.[1]

73 व्या व 74 व्या घटनादुरूस्तीने स्त्रियांना केवळ सदस्यीय प्रतिनिधीत्व न देता जि.प.अध्यक्ष, उपाध्यक्ष, पं.स.सभापती व उपसभापती, ग्रां.प. सरपंच व उपसरपंच, महापालिकेतील महापौर व उपमहापौर, नगरपरिषदेतील नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष तसेच तत्सम विषय समित्यांची सभापती पदे महिलांसाठी रोटेशन पध्दतीने राखीव ठेवण्यात आली. त्यामुळे साहजिकच महिलांचा धोरण निश्चिती निर्णय प्रक्रिया व त्यांची अंमलबजावणी यात प्रत्यक्ष सहभाग दिसून येवू लागला. ज्यामुळे खंबीर महिला नेतृत्व निर्मीतीस चालना मिळू लागली. यातूनच चांगले महिला नेतृत्व उदयास येण्यास ख[]या अर्थाने मदत झाली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

पंचायतराज व्यवस्थेतील आरक्षणामुळे देशातील 6,75,000 महिला ग्रामपंचायतीच्या सदस्या बनल्या. त्यापैकी 75000 हजाराहून अधिक सरपंच आहेत. एकूण देशातील 37,523 महिला पंचायत समितीच्या सदस्या आहेत. 1500 पेक्षा जास्त महिला सभापती आहेत आणि 3161 महिला जि.प.सदस्या आहेत. तर 122 महिला जि.प.च्या अध्यक्षा आहेत.[2] पंचायत राजमधील आरक्षणामुळे महिलांचा मोठ्या प्रमाणात राजकीय सहभाग असल्याचे चित्र आकडेवारीवरून स्पष्ट होते.

पंचायत राजमधील राजकीय सहभागामुळे स्त्रिया ख[]या अर्थाने सक्षम बनल्या. कारण आरक्षणामुळे प्रस्थापित पुरूष राजकारण्यांनी आपल्या घरातील स्त्रियांना राजकीय आखाड्यात उतरविल्यामुळे आपसुकच कर्तबगार महिलांना आपली क्षमता सिध्द करण्याची संधी मिळाली. निवडणूक प्रचारादरम्यान ग्रामीण समस्या, गरीब जनता जवळून

पाहण्याची विशेषत: घरात अडकून राहिलल्या महिला व त्यांच्या वेगवेगळ्या समस्यांची जाणीव महिला उमेदवारांना झाली.

तद्नंतर सत्तेवर येताच चिकाटीने ग्रामीण समस्या विशेषत: महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी त्या प्रयत्न क डिग्री लागल्या.

विशेषत: महिला व बालकल्याण समितीचे सभापतीपद महिलांसाठी कायमचे राखीव केल्यामुळे महिला प्रतिनीधी त्या समस्या गांभीर्याने सोडविताना दिसून येत आहेत. महिला प्रतिनिधी स्थानिक संस्थाच्या सभेमध्ये आपले प्रश्न हिरारीने मांडू लागल्यामुळे साहजिकच महिला सशक्तीकरणाला बळ मिळाल्याचे दिसून येत आहे.

स्थानिक संस्थामार्फत महिलांसाठी राबविल्या जाणाया बचत गट, गरोदर महिला पालन-पोषण योजना, सर्व शिक्षा अभियान, सुलभ शौचालय, महिला कुटीर उद्योग यासारख्या योजना आपल्या क्षेत्रात महिला प्रतिनीधी खेचून आणून त्यांची चिकाटीने पूर्ण उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने अंमलबजावणी करण्यासाठी धडपडत असताना दिसून येत आहेत. ज्यामुळे साहजिकच महिला सक्षम होताना दिसून येत आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थामुळे स्त्रियांना केवळ राजकीय प्रतिनीधीत्व मिळाले नाही तर या स्त्रिया सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होऊ लागल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या मान-सन्मानात सकारात्मक वाढ झालेली आहे. कौटुंबिक पातळीवर देखील तिचा दर्जा उंचावला आहे. तिच्या विचारांना, मतांना एक वजन-वलय प्राप्त झालेले दिसून येत आहे. स्थानिक संस्थांच्या धोरणनिर्मितीत तिचा सिंहाचा वाटा दिसून येत आहे. तिच्यामुळे समाजतील स्त्रियांनादेखील आपल कोणीतरी प्रतिनीधीत्व करतेय व आपण त्यांना आपल्या समस्या सांगू शकतो ही भावना निर्माण झाल्यामुळे त्यांच्या मनोबलात देखील वाढ झालेली दिसून येत आहे.

या संशोधन पेपरच्या प्रास्तविकात उल्लेख केल्याप्रमाणे पुरूषप्रधान संस्कृती खया अर्थाने महिला सक्षमीकरणात अडसर ठ डिग्री पाहत आहे. खया अर्थाने महिला सक्षमीकरण भविष्यात व्हायचे असेल तर महिला नेतृत्वाच्या पतीराजांचा राजकीय हस्तक्षेत्र कमी झाला पाहिजे. यासाठी पूरूषी मानसिकता बदलून महिलांवर पुर्ण विश्वास टाकणे गरजेचे आहे. वरील लेखनात राज्य महिला आयोगाने व्यक्त केलेल्या विचारानुसर महिलांना पुरूषप्रधान संस्कृतीतून मुक्त केले तरंच खया अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिला आरक्षणाची फलनिष्पती होईल यात शंका नाही.

**संदर्भ :-**

1. महाराष्ट्रातील स्त्रियांचा दर्जा व वस्तुस्थितीचे विश्लेषण - महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई पृ.116
2. यशदा यश मंथन, त्रैमासिक, जाने-मार्च 2004, पुणे पृ.29
3. फाडिया बी.एल. भारत में लोकप्रशासन- साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा 2002
4. खडपेकर विनया, स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा : स्त्री स्वातंत्र्यवादिनी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
5. डॉ.कांतराव पोले- महाराष्ट्रातील पंचायतीराज आणि महिला आरक्षण -अरूणा प्रकाशन, लातूर 2009.